Estd: 1962

NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परीक्षा विभाग

## परिपत्रक

कोव्हीड १९ आणि त्या अनुंषगाने उदभवलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर मार्च/एप्रिल/ मे, २०२० च्या उन्हाळी सत्रातील अंतिम वर्षाच्या अंतिम परीक्षा सत्राच्या ऑक्टोबर, २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या असून सदरच्या परीक्षा या ऑनलाईन आणि ऑफलाईन (विद्यार्थ्याने निवडलेल्या पर्यायानुसार) पध्दतीने होत असून विद्यार्थ्यांनी खालील सूचना अवलोकनी घ्याव्यात.

१) परीक्षार्थींनी परीक्षेपूर्वी प्रवेशपत्रावरील (हॉल तिकीट) स्वत:चा बैठक क्रमांक, परीक्षेचे वेळापत्रक व विषय यांची पडताळणी करुन घ्यावी. तसेच वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येणाऱ्या सूचना अवलोकनी घ्याव्यात. परीक्षार्थींनी हॉलतिकीटची प्रिंट काढून सोबत ठेवावी.

२) ऑनलाईन / ऑफलाईन परीक्षा देताना कोणत्याही प्रकारचे पुस्तक, नोटस, वही, भ्रमणध्वनी, सायंटिफिक कॅलक्युलेटर, डिजिटल डायरी अथवा तत्सम साधने यांचा वापर करण्यास प्रतिबंध आहे, याची नोंद घ्यावी.

३) ऑनलाईन परीक्षार्थींनी परीक्षेसाठी उत्तम प्रतीचे इंटरनेट कनेक्शन असल्याची खात्री करून घ्यावी तसेच ऑनलाईन परीक्षा देण्याचे Portal सोडून अन्य सर्व पोर्टल बंद करावीत आणि Instant Messing Tools (Skype, AIM, MSN Messenger) आणि ई-मेल प्रोग्रॅम बंद करावेत.

४) ऑनलाईन परीक्षार्थींनी परीक्षेदरम्यान परीक्षा देत असलेले पोर्टल मिनिमाईज करु नये.

५) परीक्षा कालावधीत इतर अनावश्यक ॲप्स अनइन्स्टॉल करावीत. तसेच आपल्या मोबाईलमधील Google Chrome Software चे Latest Update करुन घ्यावे.

६) लॅपटॉप/ डेस्कटॉप/ मोबाईल पूर्ण चार्ज असल्याची खात्री करावी.

७) ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

८) परीक्षेवेळी परीक्षार्थीच्या आसपास अन्य कोणीत्याही व्यक्तीस उपस्थित रहाता येणार नाही.

९) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देत असताना त्याठिकाणी पुरेसा प्रकाश असणे आवश्यक आहे.

१०) परीक्षार्थीने लॉगीन केल्यानंतर सबंधित विद्यार्थ्यांने त्यामधील माहीती याची पडताळणी करुन घ्यावी.

११) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी डेस्कटॉप, लॅपटॉप (Windows/Linux/Mac.) वेबकॅमेऱ्यासह तसेच स्मार्टफोनचे वेब ब्राऊझर अद्ययावत असल्याची खात्री करावी.

१२) ऑनलाईन परीक्षा देत असताना परीक्षार्थींनी मोबाईलवर कोणतेही बाहेरुन येणारे फोन/कॉल स्विकारु नयेत.

१३) परीक्षेदरम्यान इतर ॲप अथवा ब्राउझर उघडण्याचा/सर्च करण्याचा प्रयत्न करु नये. या हालचालींची नोंद सॉफ्टवेअरमध्ये होणार आहे.

१४) ॲन्टीव्हायरस विंडो, नोटीफिकेशन, अलर्टस यांचे अपडेटस अनेबल करावेत.

१५) जर परीक्षेवेळेच्या दरम्यान कोणत्याही कारणास्तव लॉगआऊट झाले तर पूर्वीचे लॉगइन व पासवर्डचे क्रिडेंशियल वापरुन परत लॉगइन होता येईल.

१६) परीक्षे दरम्यान कोणात्याही कारणास्तव ब्रेक घेता येणार नाही.

१७) विद्यापीठ संकेतस्थळाबर परीक्षेबाबत मार्गदर्शन करणारा व्हिडिओ उपलब्ध असून तो परीक्षार्थीनी पहावा.

१८) ऑफलाईन पदधतीने होणाऱ्या परीक्षा या विद्यार्थी प्रवेशीत असणाऱ्या महाविद्यालयात विहीत वेळापत्रकाप्रमाणे होणार असून या परीक्षेसाठी OMR sheet देण्यात येणार आहेत. OMR sheet वर उत्तरे नमुद करण्यासाठी काळया बॉलपेनचा वापर करावा.

१९) ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना OMR sheet उत्तरपत्रिंका खराब होणार नाहीत याची दक्षता घेऊन उत्तरपत्रिकेची हाताळणी व्यवस्थित करावी.

२०) ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यापक विद्यार्थी हितास्तव सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. कोरोनाचा संसर्गजन्य आजार विचारात घेवून महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, आरोग्य मंत्रालय यांनी कोव्हिड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सुरक्षित अंतर, प्रत्येकाकडे सॅनिटायझर व मास्कचा वापर करणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.

२१) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाबाबत तक्रार/ त्रुटी असल्यास विद्यार्थ्यानी उपकुलसचिव, परीक्षक नियुक्ती, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर, ४१६ ००४ यांचेकडे परीक्षा झाल्यापासून सात दिवसाच्या आत विभागप्रमुख/ प्राचार्य यांचेमार्फत योग्य त्या कागदपत्रासहीत सादर करावी.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र: शिवाजी वि/परीक्षा विभाग/१८३**
**दिनांक : १५/१०/२०२०**

प्रति,

१) मा. अधिविभागप्रमूख/संचालक/ सर्व पदवी आणि पदव्युत्तर अधिविभाग

२) मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था

३) मा.संचालक, दूर शिक्षण केंद्र.

४) मा. उपकुलसचिव/सहा. कुलसचिव/समन्वयक-सर्व प्रशासकीय विभाग.

५) समन्वयक, इंटरनेट कक्ष - संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.